दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १३ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ८३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## युवा उद्योजकाची निर्घृण हत्या, श्रीरामपूरात कडकडीत बंद

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील नेवासा रस्त्यावरील लक्ष्मीनारायण पॅलेस हॉटेल अँड लॉजिंगचे युवा उद्योजक आकाश चंद्रशेखर (शेखर) वेंकटरमन दुबैय्या (वय ३४) यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ रविवारी श्रीरामपूर शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. व्यापारी, विविध सामाजिक संस्था आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी बंदला पाठिंबा देत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. दरम्यान, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन न्याय मिळवून देण्याची ग्वाही दिली.

## तलाठ्याकडून माईकने हल्ला, तरुण गंभीर जखमी


**अहमदनगर:** अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात एका लग्नसमारंभात किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे गंभीर हाणामारीत रूपांतर झाले. राजेवाडी येथील मंगल कार्यालयात स्वागताची घोषणा करत असलेल्या ३७ वर्षीय तरुणावर तलाठ्याने लोखंडी रॉड असलेल्या माईकने हल्ला केल्याची घटना शनिवारी (११ जुलै) दुपारी घडली. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

# बंगालच्या उपसागरात रिश्टर स्केलवर 4.5 तीव्रतेचा भूकंप; विशाखापट्टणमपर्यंत जाणवले धक्के

**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यापासून दूर बंगालच्या उपसागरात रविवारी पहाटे ४.५ रिश्टर तीव्रतेचा सौम्य भूकंप झाला. या भूकंपाचे धक्के विशाखापट्टणम शहरातील अनेक भागांत जाणवले. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती मिळालेली नाही. दिलासादायक बाब म्हणजे भूकंपाचा परिणाम मर्यादित राहिला आणि कोणतीही मोठी आपत्ती किंवा जनहानी झाली नाही.

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (इन्कॉइस) यांच्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ५ वाजून ५ मिनिटे ४६ सेकंदांनी (भारतीय प्रमाणवेळेनुसार) भूकंपाची नोंद झाली. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ४.५ इतकी होती. भूकंपाचे केंद्र बंगालच्या उपसागरात आंध्र प्रदेशातील काकीनाडा किनाऱ्यापासून सुमारे २२५ किलोमीटर अंतरावर होते. त्याचे केंद्रबिंदू १६.८०५ अंश उत्तर अक्षांश आणि ८४.३८१ अंश पूर्व रेखांश येथे, समुद्रसपाटीपासून १० किलोमीटर खोलीवर स्थित होते. (Bay of Bengal)

समुद्राच्या आत कमी खोलीवर होणाऱ्या भूकंपांवर तज्ज्ञ सातत्याने लक्ष ठेवून असतात, कारण अशा भूकंपांमुळे काही वेळा सुनामीचा धोका निर्माण होऊ शकतो. तथापि, या भूकंपानंतर सुनामीसंदर्भात कोणतीही इशारा सूचना जारी करण्यात आलेली नाही.



अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, भूकंपाचे सौम्य धक्के विशाखापट्टणम शहरातील अनेक भागांत जाणवले. सकाळी अचानक झालेल्या कंपनामुळे काही नागरिकांनी घरांबाहेर आणि इमारतीबाहेर पडणे सुरक्षित समजले, तर अनेकांनी सामाजिक माध्यमांवर आपले अनुभवही शेअर केले. मात्र, धक्क्यांची तीव्रता कमी होती आणि ते केवळ काही सेकंदच जाणवले. त्यामुळे कोणतीही घबराट, गोंधळ किंवा चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली नाही.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी, दुखापत, मालमत्तेचे नुकसान किंवा इतर प्रकारची हानी झाल्याची नोंद नाही. स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून, खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या संपूर्ण परिसरात परिस्थिती सामान्य आहे. गेल्या काही महिन्यांत भारतातील विविध भागांत सौम्य आणि मध्यम तीव्रतेचे भूकंप नोंदवले गेले आहेत. दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (एनसीआर), जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, अंदमान-निकोबार बेटे तसेच ईशान्य भारतातील अनेक राज्यांमध्ये वेळोवेळी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. तज्ज्ञांच्या मते, भारतीय भूगर्भीय प्लेट सतत युरेशियन प्लेटला धडकत असल्यामुळे विशेषतः हिमालयीन प्रदेश आणि त्याच्या आसपासच्या भागांत भूकंपीय हालचाली अधिक प्रमाणात होणे स्वाभाविक आहे. तसेच, बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागर परिसरातील समुद्राखालील भूगर्भीय हालचालींमुळेही वेळोवेळी भूकंप होतात. शास्त्रज्ञांच्या मते, बहुतेक सौम्य भूकंप हे सामान्य टेक्टॉनिक हालचालींचाच एक भाग असतात. मात्र, नागरिकांनी नेहमी सतर्क राहून भूकंपाच्या वेळी सुरक्षा नियम आणि मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

## थोडक्यात वार्ता

### संत ज्ञानेश्वर माऊली'च्या चरणी सुनेत्रा अजितदादा पवार



पुणे - अखंड हरिनामाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आज सासवड येथील पालखी तळावर जाऊन जगद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेतले. 'माऊली'च्या चरणी नतमस्तक होत त्यांनी राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीची प्रार्थना केली. वारीच्या समतेच्या आणि सेवाभावाच्या परंपरेला अभिवादन करत सुनेत्रा अजित पवार यांनी वारकरी आणि पालखी प्रमुखांसमवेत जमिनीवर बसून सहभोजन केले. यावेळी त्यांनी वारकऱ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या वारीतील अनुभव जाणून घेतले. भक्ती, समता आणि प्रेमाचा संदेश देणाऱ्या या पवित्र परंपरेचा त्यांनी आत्मियतेने अनुभव घेतला. यावेळी पुणे ग्रामीणचे पोलिस अधिक्षक संदीप सिंह गिल, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, तसेच अन्य पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

### नागपूरमध्ये 'स्वप्नपूर्ती' गृहनिर्माण प्रकल्पाचा शुभारंभ

**नागपूर:** नागपूरमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या 'स्वप्नपूर्ती' गृहनिर्माण प्रकल्पाचा रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना या प्रकल्पाअंतर्गत मोफत घरे उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. समारंभात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महर्षी सुदर्शनजी आणि महर्षी वाल्मिकी यांच्या नावाने विकसित होणारी ही वसाहत सर्व सुविधांनी सुसज्ज असेल. उद्याने, सामुदायिक सभागृह, सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था आणि सौर ऊर्जा प्रणाली यांचा समावेश करून आदर्श गृहनिर्माण प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. सौर ऊर्जेच्या वापरामुळे रहिवाशांचे वीजबिल कमी करण्यावरही भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रकल्पासाठी महाराष्ट्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. शहराची स्वच्छता राखणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन्मानाने राहता यावे, यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### आनंद सरोदे यांना पीएच.डी पदवी प्रदान



हिंदू प्रकाशवार्ता

**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ग्रंथालय आणि माहीती शास्त्र विषयात आनंद राजाबापू सरोदे यांना पीएच. डी ही पदवी प्रदान करण्यात आली. आनंद सरोदे यांनी आंतरविद्याखा अधिष्ठाता डॉ. वैशाली खापर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली "सायंटोमेट्रिक ॲनालिसिस ऑफ आर्मामेंट अँड कॉम्बॅट इंजिनिअरिंग लिटरेचर - स्टडी बेस्ड ऑन ए.सी.ई. क्लस्टर लॅब्स ऑफ डीआरडीओ."या विषयावर संशोधन केले. त्यांचे सर्व मित्रपरिवारांकडून अभिनंदन होत आहे.

## तुटलेल्या विजेच्या तार अंगावर पडल्यानेएका बैलाचा मृत्यू; सुदैवाने दुसरा बैल व शेतकरी बचावला

### घटना गोरेगाव शिवार परिसरात घडली

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी .

**परभणी :** येथील सेलू तालुक्यातील गोहेगाव येथे शेतकरी शेतात मशागतीचे काम करत असताना अचानक विजेचा प्रवाह चालू असलेली तार तुटून अंगावर पडल्याने एका बैलाचा जागीच मृत्यू झाला ही घटना शनिवार दिनांक 11 जुलै रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास गोळेगाव शिवारातील गट नंबर एक मध्ये घडली. त्या अवताचे जु लाकडी असल्याने शेतकरी आणि दुसरा बैल या भीषण अपघातुन बाल बाल बचावले.

याबाबत अधिक सविस्तर माहिती अशी की, सेलू तालुक्यातील गोहेगाव येथील शेतकरी उद्धव राजाराम जावळे वय 65 वर्ष हे शनिवारी दुपारी दीड वाजताच्या सुमारास गट नंबर एक मधील बैलाच्या साह्याने मशागत करत होते मशागतीच्या कामात व्यस्त असताना शेताच्या वरून जाणारी महावितरण ची विद्युत प्रवाह चालू असणारी विजेची तार तुटून थेट एका बैलाच्या अंगावर पडली विजेचे उच्च दाब प्रवाह असल्यामुळे विजेचा तीव्र धक्का बसल्याने बैलाचा जागीच मृत्यू झाला सुदैवाने शेतकरी उद्धव जावळे हे मशागत करत असलेले आहोत औत जरी लोखंडाचे असले तरी त्याला जोडलेला जु मात्र लाकडी होते व लाकूड हे वीज वाहक नसल्यामुळे विजेचा प्रवाह दुसऱ्या बैलापर्यंत व शेतकऱ्यापर्यंत पोहोचला नसल्यामुळे शेतकरी उद्धवराव जावळे व दुसरा बैल सुदैवाने बाल बाल बचावले आहेत या घटनेची माहिती मिळताच गोहेगावचे पोलीस पाटील बापू चाळके व महादेव गटकळ यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी तात्काळ शेताकडे मदतीसाठी धाव घेतली या घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार गुलाब राठोड पोलीस नायक सुरेश कदम यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला या घटनेत शेतकरी जावळे यांचा बैल दगावल्याने सुमारे 75 ते 80 हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असल्याने वयोवृद्ध नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाने व महावितरणने तात्काळ योग्य ते आर्थिक मदत द्यावी अशी मागणी समस्त गावकरी व शेतकरी यांनी केली आहे.

## पालखी सोहळ्यात चोरांचा धुमाकूळ! 67 महिला, 22 पुरुषांसह 89 संशयित ताब्यात

**पुणे :** श्री संत तुकाराम महाराज आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्यात लाखो वारकरी भक्तिभावाने सहभागी झाले होते. मात्र, या पवित्र सोहळ्यालाच काही चोरट्यांनी गालबोट लावल्याचे समोर आले आहे. गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या, मंगळसूत्रे आणि महागडे मोबाईल चोरणाऱ्या टोळीविरोधात पुणे पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ८९ संशयितांना ताब्यात घेतले आहे. पालखी सोहळ्यादरम्यान शहरात चोरीच्या ११ घटना नोंदवण्यात आल्या. त्यापैकी ९ घटना हडपसर परिसरात घडल्याने खळबळ उडाली. गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी वारकऱ्यांचे मोबाईल आणि दागिने लंपास केले. या प्रकरणी हडपसर, समर्थ, विश्रामबाग, शिवाजीनगर, वानवडी आणि खडकी पोलीस ठाण्यांमध्ये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने चार विशेष पथके तैनात केली होती. या कारवाईदरम्यान ६७ महिला आणि २२ पुरुष अशा एकूण ८९ संशयितांना ताब्यात घेण्यात आले. या सर्वांची सध्या कसून चौकशी सुरू असून, वारीच्या गर्दीचा फायदा घेण्यासाठी महिला चोरांची मोठी टोळी सक्रिय असल्याचे तपासात समोर आले आहे. वानवडी (Wanwadi) परिसरातील शंकरमठ-रामनाथ मळा येथे पालखी दर्शनासाठी आलेल्या एका भाविकाच्या पँटच्या खिशातून सुमारे ४० हजार रुपयांचा मोबाईल चोरट्यांनी लंपास केला. मात्र, नागरिकांनी प्रसंगावधान राखत दोन संशयितांना रंगेहात पकडून थेट पोलिसांच्या स्वाधीन केले.

## सत्तेची मस्ती की प्रशासनाचा सूड? मंगेश साबळेंना 'टार्गेट' करणारा पडद्यामागचा सूत्रधार कोण?

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गोरगरीब जनता, हक्काचे प्रश्न आणि गावाचा विकास यासाठी छातीठोकपणे प्रशासनाशी भिडणाऱ्या एका चांगल्या, सामाजिक काम करणाऱ्या सरपंचाची प्रशासकीय यंत्रणेकडून केली जाणारी कोंडी आता सर्वसामान्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहत आहे. गेवराई पायगा (ता. फुलंब्री) येथील आक्रमक सरपंच मंगेश साबळे यांच्यावर ज्या पद्धतीने एकामागून एक गुन्हे दाखल करून त्यांना अडकवण्याचे सत्र सुरू आहे, ते पाहता "हा कायद्याचा बडगा आहे की सत्तेच्या इशाऱ्यावर सुरू असलेला प्रशासकीय सूड?" असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही मार्गाने हक्कासाठी आवाज उठवल्यानंतर आधी सिटी चौक पोलिसांनी त्यांना अटक केली. हा धक्का ओसरतो न ओसरतो, तोच आता महिनाभरापूर्वीच्या एका साध्या प्रसंगाचे भांडवल करून क्रांती चौक पोलीस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या सीईओ मिन्नू पी. एम. यांच्या गाडीसमोर उभे राहून ग्रामपंचायतीच्या हक्काच्या बिलासाठी जाब विचारणे हा जर गुन्हा असेल, तर लोकशाहीत जनतेने दाद मागायची कुणाकडे? असा उद्विग्न प्रश्न आता जनता विचारत आहे. मंगेश साबळे यांच्यावर एखाद्या अट्टल, सराईत गुन्हेगाराप्रमाणे कारवाई होताना पाहून फुलंब्री तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील जनता हळहळत आहे आणि पेटून उठली आहे. सोशल मीडियावर सध्या मंगेश साबळेंचे व्हिडिओ एखाद्या क्रांतिकारकाप्रमाणे व्हायरल होत असून, त्याला देशभक्तीच्या गाण्यांची जोड दिली जात आहे. जनता साबळेंच्या पाठीशी खंबीरपणे उभी असताना, प्रशासन मात्र त्यांच्याभोवतीचा कायदेशीर फास अधिकाधिक घट्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. एका सामान्य घरातील कार्यकर्ता, जो सरपंचाच्या माध्यमातून जनतेची सेवा करतोय, त्याला अशा प्रकारे प्रशासकीय ताकदीचा गैरवापर करून तुरुंगात सडवण्याचे कारस्थान जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. जर हा अन्याय असाच सुरू राहिला आणि राजकीय दबावापोटी मंगेश साबळे यांच्यावर आणखी गुन्हे लादले गेले, तर फुलंब्री तालुक्यातील जनता शांत बसणार नाही. या अन्यायाविरोधात जनआंदोलनाचा प्रचंड मोठा उद्रेक होईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी ही सूडबुद्धीने वागणाऱ्या प्रशासनाची असेल, असा इशारा आता जनतेतून दिला जात आहे.



### जिल्हाधिकाऱ्यांच्या आडून कोण काढतय खुन्नस ? पडद्यामागे 'ती' की तो ?

**मंगेश साबळे हे काही महिन्यांपूर्वी एका बड्या लोकप्रतिनिधीच्या चुकीच्या कारभाराविरुद्ध अतिशय आक्रमक झाले होते. तेव्हापासूनच ते सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यात खुपत होते. त्यामुळेच आता जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाचा ढाल म्हणून वापर करून साबळे यांना कायमचे संपवण्याचा, त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून केला जात असल्याचा संशय फुलंब्री तालुक्यातील जनतेला येऊ लागला आहे. "जिल्हाधिकाऱ्यांच्या आडून धडा शिकवणारा तो 'मास्टरमाइंड' कोण?" याचीच चर्चा आता गल्लीबोळात सुरू आहे.**

**उद्या मंगेश भाऊ साबळे यांच्या जामीनासाठी व तसेच तहसीलदार मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी केलेल्या खोट्या गुन्ह्या मध्ये अटक हे एका सरपंच आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येऊन रोष व्यक्त केला त्याचा नेमका गुन्हा काय आहे त्याला चार दिवसापासून कोठडी टाकल्या जात आहे आणि म्हणून मी उद्या टीव्ही सेंटरच्या मोबाईल टावर वरती चढून आत्मदहनाचा इशारा देणार आहे.**

**गजानन देवरे**
**सामाजिक कार्यकर्ता**
**फुलंब्री**

एकामागून एक गुन्हे...?

**पहिले आंदोलन :** जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा परिषदेतील शाळेतील शिक्षकांना निवडणुक, एसआरआयच्या कामात लावल्या च्या विरोधात आवाज उठवला, म्हणून गुन्हा दाखल करत चार दिवसाची पोलीस कोठडी!

**दुसरे आंदोलन :** ८ जून रोजी जिल्हा परिषदेत हक्काचा निधी आणि बिलांसाठी सीईओ मिन्नू पी. एम. यांच्या गाडीसमोर उभे राहून जाब विचारला. तिथे कोणतीही अरेरावी नव्हती, आमदार प्रशांत बंब यांच्या मध्यस्थीने विषय शांत झाला आणि बिलेही निघाली.

**आताची कारवाई :** महिनाभर जुने झालेले हे प्रकरण अचानक उकरून काढण्यात आले. विशेष म्हणजे, यात कोणत्याही अधिकाऱ्याने तक्रार दिली नसून, पोलिसांनी 'स्वतःहून' (सुमोटो) फिर्याद दाखल केली आहे! काही मिनिटे गाडी रोखली म्हणून थेट गुन्हा? हा प्रशासनाचा अट्टहास कोणासाठी?

## स्वच्छतेसाठी आयुक्त अमोल येडगे मैदानात; दोन दिवसांत एक लाखांचा दंड, 29 विशेष पथके सक्रिय

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी महानगरपालिकेने विशेष संयुक्त पाहणी मोहीम सुरू केली असून, मनपा आयुक्त अमोल येडगे स्वतः रात्री रस्त्यावर उतरून स्वच्छतेची पाहणी करत आहेत. या मोहिमेअंतर्गत अवघ्या दोन दिवसांत नियमभंग करणाऱ्यांकडून सुमारे एक लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.





आयुक्तांच्या संकल्पनेतून शहरात २९ विशेष संयुक्त पथके कार्यरत करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकात स्वच्छता निरीक्षक, नागरिक मित्र पथकाचे कर्मचारी, आयईसी सुपरवायझर आणि वाहन सुपरवायझर यांचा समावेश आहे. ही पथके दर सोमवार व गुरुवारी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत प्रमुख बाजारपेठा, हॉटेल्स, दुकाने आणि पानटपऱ्यांची अचानक तपासणी करत आहेत. दुकानासमोरील स्वच्छता, ओला-सुका कचरा वेगळा ठेवणे, घंटागाडीतच कचरा देणे तसेच सिंगल-यूज प्लास्टिकचा वापर टाळला जात आहे की नाही, याची पाहणी केली जात आहे.

या मोहिमेची जबाबदारी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्याकडे आहे. गुलमंडी, पैठण गेट, सिटी चौक, टीव्ही सेंटर, सेंट्रल नाका, चिश्तिया चौकसह १३ व्यावसायिक प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली. एका दिवसात ३८ हजार रुपयांचा दंड वसूल झाला असून, प्रभाग क्रमांक ५ आणि १५ मध्ये प्रत्येकी सहा हजार रुपयांचा सर्वाधिक दंड आकारण्यात आला.

आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले की, शहराला स्वच्छतेत देशात अग्रस्थानी नेण्यासाठी नागरिक व व्यापाऱ्यांचा सहभाग अत्यावश्यक आहे. प्रारंभी जनजागृतीवर भर दिला जाणार असला तरी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहील.

या उपक्रमाचे व्यापारी संघटनांनी स्वागत केले आहे. स्वच्छ शहराचा फायदा व्यापाऱ्यांनाही होत असल्याने कचरा वर्गीकरणासह मनपाच्या मोहिमेला पूर्ण सहकार्य करू, अशी भूमिका व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. दंडात्मक कारवाईबरोबरच व्यापाऱ्यांशी थेट संवाद, जनजागृती आणि प्रत्यक्ष पाहणी यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळ मिळणार असल्याचे चित्र आहे.

## "शाल जोडे"



# संपादकीय

## तळपते तापमान आणि शहरी नियोजनाचे गंभीर आव्हान

जागतिक स्तरावर सातत्याने वाढणारे तापमान आणि त्यामुळे निर्माण होणारे हवामान बदलाचे संकट आता केवळ चर्चांपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते थेट आपल्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. 'सस्टेनेबल सिटीज अँड सोसायटी' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या जागतिक स्तरावरील ताज्या अभ्यासानुसार, जगातील तीव्र उष्णतेचा धोका असलेल्या ५० शहरांच्या यादीत भारतातील तब्बल १४ शहरांचा समावेश असणे आणि त्यात महाराष्ट्रातील पुणे व नागपूर या दोन प्रमुख शहरांचे नाव असणे ही अत्यंत चिंताजनक व धक्कादायक बाब आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या सानिध्यामुळे संध्याकाळच्या सुखद व थंड वाऱ्यासाठी आणि आल्हाददायक हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या पुण्याची या यादीतील उपस्थिती ही राज्यासाठी एका मोठ्या धोक्याची घंटा मानली पाहिजे. या संशोधनातून समोर आलेली निरीक्षणे अतिशय वास्तववादी आणि डोळे उघडवणारी आहेत. पृथ्वीच्या वाढत्या तापमानाचा फटका केवळ हवामानालाच बसत नसून, लोकसंख्येची असुरक्षितता, मर्यादित आरोग्य सुविधा, आर्थिक परिस्थिती आणि उष्णतेचा सामना करण्याची नागरिकांची कमी क्षमता यांमुळे हा धोका कैक पटीने वाढतो आहे. गुजरातमधील अहमदाबाद शहर जगात दुसऱ्या क्रमांकावर असणे हे देशासमोरील या संकटाची भीषणता स्पष्ट करते. वाढत्या शहरीकरणामुळे होणारी झाडांची बेसुमार कत्तल, सिमेंटचे जंगलात झालेले रूपांतर आणि हरित क्षेत्राचा झालेला संकोच हीच या समस्येची मुख्य मुळे आहेत. आज १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या या शहरांमध्ये नैसर्गिक संरक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. वाढत्या उष्णतेवर उपाय म्हणून सध्या जगभरात वातानुकूलन यंत्रांचा (एसी) वापर वेगाने वाढत आहे, परंतु ऊर्जा वापरावर आधारित शीतकरण व्यवस्थेवरील ही अतिनिर्भरता भविष्यात जागतिक तापमानवाढ आणखी वेगाने वाढवण्यास कारणीभूत ठरेल, हा संशोधकांनी दिलेला इशारा अत्यंत महत्त्वाचा आहे. शिवाय, अशी महागडी यंत्रे सर्वांनाच परवडणारी नसतात, ज्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या उष्णतेच्या लाटेला थेट बळी पडतात. आता केवळ आपत्कालीन उपाय करून चालणार नाही, तर प्रशासनाला आणि नागरिकांनाही 'शाश्वत शहरी नियोजनाचा' विचार करावा लागेल. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे, तलाव व पाण्याचे साठे जपणे आणि हरित पट्टे तयार करणे यांसारख्या नैसर्गिक घटकांना सर्वोच्च प्राधान्य दिले, तरच आपण आपल्या शहरांना राहण्यायोग्य ठेवू शकू. अन्यथा, निसर्गाचा हा वाढता कोप मानवी जीवनाचा पायाच हादरवून सोडेल यात शंका नाही.


# मिटमिट्यात 'काळ्या पैशांचा खजिना' उघड; ५.६३ कोटींची रोकड, शस्त्रे आणि दागिन्यांचा साठा जप्त

## 6,350 जिवंत काडतुसे, पिस्तुले, रायफल, तलवार आणि 21 धारदार शस्त्रे हस्तगत

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मिटमिटा परिसरातील एका घरावर गुन्हे शाखेने शुक्रवारी मध्यरात्री टाकलेल्या धाडीत पोलिसांनाही धक्का बसला. एका घरातून तब्बल ५ कोटी २६ लाख २९ हजार ५६० रुपयांची बेहिशोबी रोख रक्कम, लाखो रुपयांचे सोने-चांदीचे दागिने, अग्निशस्त्रांचा मोठा साठा आणि ६,३५० जिवंत काडतुसे असा एकूण ५ कोटी ६३ लाख ३७ हजार ९९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शहराच्या इतिहासातील मोजक्या मोठ्या कारवायांपैकी मानल्या जाणाऱ्या या धाडीमुळे मोठी खळबळ उडाली असून, एवढ्या मोठ्या प्रमाणातील रोकड आणि शस्त्रसाठा नेमका कुठून आला, याचा तपास आता विविध यंत्रणांकडून केला जाणार आहे.






गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मिटमिटा येथील एका घरात बेहिशोबी रोख रक्कम आणि अग्निशस्त्रे लपवून ठेवल्याची माहिती मिळाली होती. ही माहिती पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांना देण्यात आल्यानंतर त्यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखा आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला. झडतीदरम्यान घरात उपस्थित असलेल्या शिला साळवे यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात रोकड, दागिने, शस्त्रे आणि काडतुसे आढळून आली.

पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये ५ कोटी २६ लाख २९ हजार ५६० रुपयांची रोख रक्कम, २१ लाख ३४ हजार ३५० रुपयांचे १५१.३३ ग्रॅम सोन्याचे दागिने, ८ लाख ९ हजार २४८ रुपयांचे ३.९ किलो चांदीचे दागिने तसेच विविध कंपन्यांच्या मद्याच्या बाटल्यांचाही समावेश आहे.

याशिवाय दोन पिस्तुले, चार रायफल, एक तलवार, १७ चाकू आणि तीन गुप्त्या असा मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. तसेच १२ बोर, ७.६५ मिमी आणि .२२ कॅलिबरची मिळून ६,३५० जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. प्राथमिक तपासात जप्त करण्यात आलेल्या काही शस्त्रांचे परवाने मृत व्यक्तीच्या नावावर असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा, महाराष्ट्र पोलीस कायदा आणि मद्यनिषेध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक जाधव करीत आहेत. जप्त करण्यात आलेल्या बेहिशोबी रोख रकमेबाबत आयकर विभागालाही माहिती देण्यात आली असून, या संपत्तीचा स्रोत, शस्त्रसाठ्याचा उद्देश आणि या प्रकरणामागे आर्थिक अथवा गुन्हेगारी रॅकेट आहे का, याचाही तपास सुरू करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) शशिकांत सातव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) मजहर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. या धाडीमुळे शहरात मोठी चर्चा सुरू असून, तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# नवीन योजनेतील तांत्रिक दुरुस्त्या दूर केल्याशिवाय शहराला पाणी मिळणे दुरापास्त - राजेंद्र दाते पाटील

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** पाणी पुरवठा योजनेतील तांत्रिक दुरुस्त्या दूर केल्याशिवाय संभाजीनगरवासीयांचे वेळेवर पाणी मिळण्याचे स्वप्न पूर्ण होवू शकत नाही, असे प्रतिपादन जल अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी मराठवाडा पाणी परिषदेतर्फे सिडको एन-२ मधील ग्राम विकास भवनमध्ये आयोजित जलमंथन उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून 'छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजना व सद्यस्थिती' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, माजी अधीक्षक अभियंता डॉ. जयसिंग हिरे, दादासाहेब शिंदे, जलधोरण विषयाचे नियोजक रामचंद्र पिल्दे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना दाते पाटील म्हणाले, नागरिक अनेक वर्षापासून वेळेवर व दररोज पिण्याच्या पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. परंतु, वस्तुस्थिती वेगळी आहे. प्रस्तावित ५६ पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम अपूर्ण आहेत. २५०० मि. मी. व्यासाची जलवाहिनी अपूर्ण असून, ९०० मी. मी. व्यासाची जलवाहिनी व मुख्य जलवाहिनीची हायड्रोलिक टेस्टिंग करणे अत्यावश्यक आहे. शहरातील सामान्य ग्राहकांपर्यंत मोठ्या प्रमाणात जलवाहिनीचे काम बाकी आहे. शहराची गरज साधारणतः ३७५ ते ४०० द. घ. ली. पाण्याची असताना सद्यस्थितीत फक्त १५०ते १७० द.घ.ली. पाणी उपलब्ध होत आहे. या योजनेची सविस्तर तांत्रिक माहिती जलमंथनमध्ये प्रथमच दाते पाटील यांनी विषद करताना नमूद केले की, पाणी साठवणूक क्षमता आणि ग्राहकांपर्यंत पाईपलाईन अंथरलेली नसल्यामुळे पाणी वाढवून सुद्धा परिणामी नागरिकांना आठ दिवसाला एकदा, ते ही अनियमित वेळेत पाणी पुरवठा होतो. अशा परिस्थितीत दररोज वेळेवर व पुरेसे पाणी मिळेल, हे दिवास्वप्नच असल्याचे ते म्हणाले.

याप्रसंगी डॉ. जयसिंग हिरे यांनी काही महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. शहराची पाणीपुरवठा योजना वेळेत पूर्ण करून शहरवासीयांना लवकरात लवकर पाणी उपलब्ध करून द्यावे यासाठी लवकरच जलमंथन ग्रुपतर्फे महापालिका आयुक्तांना याबाबतचे निवेदन देण्याचे ठरले.

नरहरी शिवपुरे यांनी प्रास्ताविकात आशिया खंडात वेगाने वाढणाऱ्या व औद्योगिकक्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. यासाठी समाजातील बुद्धीवादी, जल अभ्यासक व जागरूक नागरिकांनी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे, याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमात सिंदोन गावचे प्रगतिशील शेतकरी दादासाहेब शिंदे यांना वसंतराव नाईक संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानचा 'फुलशेती पुरस्कार' मिळाल्याबाबत त्यांचा सत्कार करण्यात आला.

परिषदेत मराठवाड्यातील जलप्रश्नांचा अभ्यास, वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाययोजना आणि लोकसहभागातून जलधोरणावर विधायक चर्चा घडवून आणण्यात येते. याप्रसंगी विद्यापीठातील जीएमएनआयआरडीचे डॉ. राहुल महामुनी, जयप्रकाश बागडे, शिवाजी घुगे ,सतीश वानखेडे, भारती खरटमल, अशोक कोळी यांच्यासह जलक्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अर्चना पवार, निवृत्ती घोडके, योगिता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## फर्दापूर परिसरात रस्ते विकासाला गती; महामार्ग प्रकल्पांमुळे वाहतुकीला नवी दिशा

फर्दापूर, दि. १२ (प्रतिनिधी) – अजिंठा लेणी परिसरासह फर्दापूर व सोयगाव तालुक्यातील रस्ते विकासाला वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या विविध महत्त्वाकांक्षी महामार्ग प्रकल्पांमुळे या भागातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, जलद आणि आधुनिक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामध्ये प्रस्तावित खान्देश द्रुतगती महामार्ग, नागद–बनोटी–फर्दापूर राज्य मार्ग (SH-24) सुधारणा प्रकल्प तसेच सिल्लोड–फर्दापूर राष्ट्रीय महामार्ग (NH-753F) यांचा समावेश आहे.

प्रस्तावित खान्देश द्रुतगती महामार्ग (Khandesh Expressway) चे सर्वेक्षण सुरू असून हा महामार्ग छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फर्दापूर किंवा सोयगाव परिसरातून जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जगप्रसिद्ध अजिंठा लेणींचे ऐतिहासिक व जागतिक वारसा मूल्य लक्षात घेऊन या महामार्गाची रचना अत्यंत काळजीपूर्वक करण्यात येणार आहे. लेणी परिसरावर कोणताही प्रतिकूल परिणाम होऊ नये यासाठी डोंगराळ भागातून पर्यावरणपूरक आणि तांत्रिकदृष्ट्या सुरक्षित मार्गाचा पर्याय विचाराधीन असल्याचे समजते.

दरम्यान, नागद–बनोटी–फर्दापूर राज्य मार्ग (SH-24) सुधारणा प्रकल्पालाही गती मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (MSIDC) मार्फत सुमारे ३०३ कोटी रुपयांच्या या महत्त्वाच्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणासह मजबुतीकरण, दर्जेदार डांबरीकरण, पूल व नाल्यांची उभारणी तसेच सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. हा मार्ग सुधारल्यास ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, व्यापारी तसेच पर्यटकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

याचबरोबर सिल्लोड–फर्दापूर राष्ट्रीय महामार्ग (NH-753F) चे काम टप्प्याटप्प्याने सुरू असले तरी अनेक ठिकाणी काम अद्याप अपूर्ण आहे. काही भागात खड्डे, रस्त्यावरील असमतोल पृष्ठभाग आणि अपूर्ण बांधकामामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः अजिंठा लेणीकडे जाणाऱ्या पर्यटकांना तसेच जळगाव–छत्रपती संभाजीनगर मार्गावरील नियमित प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या पावसाळ्यामुळे फर्दापूर व अजिंठा घाट परिसरात दरड कोसळण्याचा धोका वाढला असून रस्त्यांवर खड्डेही निर्माण झाले आहेत. त्यामुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून सुरक्षित अंतर राखावे, घाट परिसरात अनावश्यक ओव्हरटेक टाळावे आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

हे सर्व प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण झाल्यास फर्दापूर, सोयगाव, सिल्लोड तसेच अजिंठा पर्यटन परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून वाहतूक अधिक सुरक्षित, गतिमान आणि सुकर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे पुन्हा पाच वर्षांसाठी संतपीठचे शैक्षणिक व्यवस्थापन

## चालू वर्षासाठी 50 लाखांचा निधी मंजूर, चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडून आश्वासनांची पूर्तता

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० :** महाराष्ट्रातील संत साहित्य आणि अध्यात्मिक परंपरेच्या अध्ययनाला नवी गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य शासनाने घेतला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मंत्री मा ना चंद्रकांत दादा पाटील यांच्या आदेशानुसार श्री क्षेत्र पैठण येथील संतपीठचे शैक्षणिक व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे पुढील पाच वर्षांसाठी सोपविण्यात आले असून चालू वर्षासाठी ५० लाखांचा निधी मंजूर आहे. या संदर्भात मा कुलगुरू डॉ विजय फुलारी यांनी केलेल्या पाठपुराव्यास यश आले आहे.

राज्य शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे संतपीठ व्यवस्थपन सोपविण्याचा निर्णय २०२१ मध्ये घेतला. सन २०२१-२२ पासून अभ्यासक्रम सुरु आहेत. आतापर्यंत पाच अभ्यासक्रमाच्या आठ बॅच व १ हजार ७२ विद्यार्थी यांनी अभ्याक्रम पूर्ण केला आहे. विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी दहावी बॅच सुरु होत आहे. गेल्या अडीच वर्षांपासून मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली संतपीठ कार्यरत आहे. संतपीठाच्या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या वर्षी मंत्रालयात बैठक घेण्यात आली. बैठकीस मा कुलगुरू डॉ. विजय फुलारी, संतपीठाचे समनव्यक तथा प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, कुलसचिव प्रशांत अमृतकर यांची बैठक होती. या नंतरही बैठक तसेच विद्यापीठ प्रशासनाकडून पाठपुरावा करण्यात आला. या संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने ८ जुलै २०२६ रोजी शासन आदेश जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे संतपीठामध्ये भारतीय परंपरा व संस्कृती, संतसंप्रदाय, संत साहित्य, कीर्तन, प्रवचन, तत्त्वज्ञान तसेच संबंधित विषयांवरील प्रमाणपत्र, पदविका अभ्यासक्रम नियमितपणे राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.शासनाने सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी संतपीठाच्या शैक्षणिक व्यवस्थापनासाठी रु. ५० लाखांचा निधी मंजूर केला आहे. पुढील चार वर्षांच्या कालावधीबाबत विद्यापीठाकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर स्वतंत्र निर्णय घेतला जाणार आहे. शासनाच्या अटींनुसार विविध अभ्यासक्रमांना आवश्यक त्या प्राधिकरणांची मान्यता घेणे, विविध संतसंप्रदायांच्या अभ्यासासाठी स्वतंत्र अभ्यासघटक विकसित करणे, प्रत्येक संतसंप्रदायाला अभ्यासक्रमात योग्य स्थान देणे आणि शासनाच्या आर्थिक व प्रशासकीय नियमांचे काटेकोर पालन करणे विद्यापीठासाठी आवश्यक राहणार आहे. तसेच संतपीठाच्या जागेची व इमारतीची मालकी शासनाकडेच राहणार असून ती शैक्षणिक उपक्रमांसाठी विद्यापीठाच्या ताब्यात वापरासाठी उपलब्ध राहील. या निर्णयामुळे संत साहित्य, भारतीय ज्ञानपरंपरा आणि महाराष्ट्राच्या संतपरंपरेच्या जतन, संवर्धन, संशोधन आणि प्रसाराला नवी दिशा मिळणार आहे. तसेच विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांसाठी संतवाङ्मय, भारतीय तत्त्वज्ञान आणि सांस्कृतिक वारसा यांचा सखोल अभ्यास करण्याच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

आता या निर्णयानुसार १७ सप्टेंबर २०२६ पासून पुढील पाच वर्षे अथवा पुढील शासन आदेशापर्यंत विद्यापीठाकडे संतपीठाचे शैक्षणिक व्यवस्थापन असणार आहे.

नामदेव गाथासह तीन नवीन अभ्यासक्रम

डॉ.बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित पैठण येथील संतपीठात सध्या पाच प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु आहेत. यामध्ये श्री तुकाराम गाथा, श्री.एकनाथी भागवत, व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु आहेत. तसेच वारकरी संप्रदाय व महानुभाव संप्रदाय परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविले जातात. गेल्या आठ बॅचमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवर व अध्यात्मिक आवड असलेल्यांनाही प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केले आहेत. आजपर्यंत एक हजार ७२ विद्यार्थ्यांनी संतसाहित्याचा अभ्यास करुन प्रमाणपत्र मिळविले आहे. चालू शैक्षणिक वर्षांपासून संत नामदेव गाथा परिचय, संत तत्वज्ञान व सांप्रदायिक संगीत हे तीन नवीन अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. सदर अभ्यासक्रम आता नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे एक वर्षाचे करण्यात येणार असून अधिष्ठाता मंडळाची मान्यता मिळाली आहे, अशी माहिती प्रकुलगुरू तथा संतपीठ समन्वयक डॉ.प्रवीण वक्ते यांनी दिली.

CHANGE OF NAME हिंदू प्रकाशवार्ता

**OLD NAME : CHAUS MUJAHEED RAZA**
**Residing At Post Shivna.Tq.Sillod.Dist Chh.Sambhajinagar [431132],**
**have changed my name to**
**NEW NAME,MUJAHID RAZA CHAUS**
**and shall hereafter be known as**
**Name : MUJAHID RAZA CHAUS**
**for all purposes.**

# नागरिकांनो बीएलओंना सहकार्य करा, गणना फॉर्म वेळेत भरून जमा करा - जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी, :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत परभणी जिल्ह्यातील कामाला मोठी गती मिळाली आहे.

शनिवार (11 जुलै) रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत जिल्ह्यातील 15 लाख 41 हजार 7 मतदारांपैकी 12 लाख 40 हजार 211 (80.48 टक्के) गणना फॉर्म मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी वितरित केले आहेत. तसेच 3 लाख 23 हजार 224 (20.97 टक्के) फॉर्मचे डिजिटायझेशन, तर 3 लाख 22 हजार 449 (20.92 टक्के) फॉर्मची पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे.

मोहिमेचा वेग कायम ठेवण्यासाठी आणि प्रगतीचा आढावा घेण्यासाठी शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची विशेष आढावा व प्रशिक्षण बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार उपस्थित राहून त्यांनी आवश्यक मार्गदर्शन केले.

आपल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना आवश्यक सहकार्य करून गणना फॉर्म अचूक भरून वेळेत जमा करावेत. यामुळे विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम यशस्वी होऊन मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक बनण्यास मदत होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

विधानसभा मतदारसंघनिहाय प्रगती पुढीलप्रमाणे आहे.

**95-जिंतूर विधानसभा मतदारसंघ :**

एकूण 3,82,716 मतदारांपैकी 2,76,050 (72.13%) गणना फॉर्म वितरित करण्यात आले असून 71,165 (18.59%) फॉर्मचे डिजिटायझेशन आणि 71,023 (18.56%) फॉर्मची पडताळणी पूर्ण झाली आहे.

**96-परभणी विधानसभा मतदारसंघ :**

एकूण 3,43,921 मतदारांपैकी 3,03,533 (88.26%) गणना फॉर्म वितरित करण्यात आले असून 51,123 (14.86%) फॉर्मचे डिजिटायझेशन आणि 50,719 (14.75%) फॉर्मची पडताळणी पूर्ण झाली आहे.

**97-गंगाखेड विधानसभा मतदारसंघ :**

एकूण 4,17,481 मतदारांपैकी 3,53,461 (84.67%) गणना फॉर्म वितरित करण्यात आले असून 1,11,689 (26.75%) फॉर्मचे डिजिटायझेशन आणि 1,11,572 (26.73%) फॉर्मची पडताळणी पूर्ण झाली आहे.

**98-पाथरी विधानसभा मतदारसंघ :**

एकूण 3,96,889 मतदारांपैकी 3,07,167 (77.39%) गणना फॉर्म वितरित करण्यात आले असून 89,247 (22.49%) फॉर्मचे डिजिटायझेशन आणि 89,135 (22.46%) फॉर्मची पडताळणी पूर्ण झाली आहे.

बैठकीत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेतील सर्व कामे वेळेत, अचूक आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. गणना फॉर्मचे शंभर टक्के वितरण, प्रत्येक मतदारापर्यंत घरभेटीद्वारे पोहोचणे, संगणकीकरण, पडताळणी, मॅपिंग आणि मतदार यादीतील अनॉमली कमी करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी दैनंदिन आढावा घेऊन प्रभावी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी बीएलओ यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत डिजिटायझेशन, पडताळणी, मॅपिंग आणि प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन केले. प्रत्येक नोंद अचूक राहील, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीस जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# बोरी बस स्थानकाच्या परिसरात चार दुकानावर चोरांचा डल्ला

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** बोरी येथील बस स्थानक परिसरात असलेल्या तीन किराणा दुकान व एक कृषी केंद्र हे रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन ही दुकाने फोडली व या दुकानातील रोकड घेऊन चोरटे फरार झाले शुक्रवार 10 जुलै रोजी मध्यरात्रीनंतर घडली बोर येथील मुख्य बाजारपेठेत परिसरात झालेल्या चोरीमुळे नागरिकांमध्ये असंतोषाची लाट निर्माण झाली बस स्थानक परिसरात चोरी झाल्याने चोराने पोलिसांना एक नवे आव्हान दिले आहे या चोरीमध्ये गोपाळ माने यांचे स्वराज्य कृषी केंद्र पाच हजार रुपये लंपास केली तसेच महादेव सोनटक्के यांचा किराणा दुकानातून 5000 चे रोकड लंपास केली माणिक भाग्यवंत यांच्या दुकानातून 15000 रुपये हर्षवर्धन घोलप यांच्या दुकानातून 15000 ची रोकड चोरट्याने लंपास केली सदरील घटना 11 जुलै शनिवार रोजी वृत्तपत्र वितरक आणि काही नागरिकांच्या निदर्शनास आली. सहायक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार शेख वसीम शेख मोबीन राजेश जटाळ श्रीराम दंडवते कोकाटे कांबळे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला साई पोलीस निरीक्षक राम मुंजे यांचे नेतृत्वात स्वान पथक व ठसे पथक दाखल झाले मात्र स्वान पथकाला चोरट्याचा थोडाही मागवा लागला नाही.

# राम मंदिरातील कथित अपहाराविरोधात शिवसेनेचे राज्यव्यापी आंदोलन; रत्नपूरच्या भद्रा मारोती मंदिरातून रामरक्षेचा निर्धार

## चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली महाआरती व रामरक्षा पठण; शांतीगिरी महाराजांना निवेदन, आज दिंडोरीत गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांची भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**रत्नपूर :** अयोध्येतील राम मंदिरातील कथित आर्थिक अपहाराच्या आरोपांविरोधात शिवसेनेने राज्यभर सुरू केलेल्या 'रामरक्षा आंदोलनाला' शनिवारी रत्नपूर येथील श्री भद्रा मारोती मंदिरातून वेग आला. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली महाआरती, रामरक्षा स्तोत्र, मारुती स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करून संबंधितांवर कठोर



कारवाईची मागणी करण्यात आली.

यावेळी बोलताना शिवसेना नेत्यांनी, रामभक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या देणग्यांमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याचे आरोप गंभीर असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. राज्यभर विविध धार्मिक स्थळांवर जाऊन रामभक्तांच्या भावना व्यक्त करण्याचा निर्णय आंदोलनाच्या माध्यमातून घेण्यात आल्याचेही सांगण्यात आले. आंदोलनानंतर शिष्टमंडळाने वेरूळ येथे महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यापूर्वी स्वामी नरेंद्राचार्य महाराज आणि महंत रामगिरी महाराज यांनाही निवेदन देण्यात आल्याची माहिती चंद्रकांत खैरे यांनी दिली. या कार्यक्रमास श्री भद्रा मारोती संस्थानचे अध्यक्ष मिट्टू पाटील बारगळ, शिवसेना उपनेते सुभाष पाटील, सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, माजी महापौर सुदाम सोनवणे, युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे, उपजिल्हाप्रमुख श्रीरंग आमटेपाटील, विधानसभा संघटक गिरीष चपळगावकर, शहरप्रमुख दिग्विजय शेरखाने यांच्यासह शिवसेना, युवासेना व महिला आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ड्रग्ज माफियांना मोठा दणका! 37.62 लाखांचा 260 किलोहून अधिक अंमलीपदार्थ कायमचा नष्ट

## नऊ पोलीस ठाण्यांतील जप्त मुद्देमाल न्यायालयीन प्रक्रियेनंतर रांजणगाव येथे जाळला; शहराला 'ड्रग्जमुक्त' करण्याच्या मोहिमेला वेग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील अंमलीपदार्थांच्या अवैध जाळ्यावर मोठा घाव घालत पोलीस आयुक्तालयाने तब्बल ३७ लाख ६२ हजार ६४४ रुपये किमतीचा २६० किलो ७९८ ग्रॅम अंमलीपदार्थ कायमचा नष्ट केला.
विविध कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला हा साठा न्यायालयाची परवानगी, न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेचा अहवाल आणि एनडीपीएस कायद्यातील सर्व प्रक्रिया पूर्ण करून पुणे जिल्ह्यातील रांजणगाव येथील शासनमान्य प्रकल्पात नष्ट करण्यात आला.

या कारवाईत २६० किलो ११३ ग्रॅम गांजा, ६०४ ग्रॅम ६० मिलीग्रॅम चरस आणि २१ ग्रॅम १५ मिलीग्रॅम एमडी पावडर यांचा समावेश होता. हा अंमलीपदार्थ बेगमपुरा, सिटीचौक, एमआयडीसी वाळूज, दौलताबाद, जिन्सी, छावणी, एमआयडीसी सिडको, सातारा आणि हर्सूल पोलीस ठाण्यांनी विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केला होता.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत सर्व मुद्देमाल केंद्रीय गोदामातून कडेकोट पोलीस बंदोबस्तात महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लिमिटेड, एमआयडीसी रांजणगाव (ता. शिरूर, जि. पुणे) येथे नेण्यात आला. तेथे पर्यावरणीय नियमांचे पालन करत कायदेशीर पद्धतीने त्याचा नाश करण्यात आला.

अंमलीपदार्थांचा साठा जप्त करणे ही कारवाईची केवळ पहिली पायरी असते; मात्र तो कायमचा नष्ट झाल्यानंतर तो पुन्हा काळ्या बाजारात जाण्याची शक्यता पूर्णपणे संपुष्टात येते. त्यामुळे या कारवाईकडे शहरातील ड्रग्जविरोधी मोहिमेतील महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिले जात आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपआयुक्त पंकज अतुलकर व शशिकांत सातव, सहाय्यक पोलीस आयुक्त मजहर सय्यद, अंमलीपदार्थ प्रतिबंधक विभाग, गुन्हे शाखा तसेच संबंधित पोलीस ठाण्यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहभागातून पार पडली.

शहरात अंमलीपदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधातील कारवाया आणखी तीव्र करण्याचा पोलीस आयुक्तालयाचा निर्धार असून, ड्रग्ज तस्करी करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# सिलेंडर चोरणारे चोर ताब्यात; 14 टाक्या व पिकअप जप्त

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** सेलू तालुक्यातील खवणे पिंपरी येथील इंडियन गॅस एजन्सी चे गोडाऊन फोडून गॅस सिलेंडरच्या टाक्याची चोरी झाल्याची घटना 26 मार्च रोजी घडली होती या प्रकरणाचा पाथरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता सदरील या गुन्ह्याची उकल शुक्रवार 10 जुलै रोजी तपास करून उघडकीस आला आणि गुन्हे शाखा व पाथरी पोलीस स्टेशन यांच्याकडून तपास चालू करण्यात आला. त्या तपासात एक आरोपीस मुद्देमाला सहितताब्यात घेण्यात आले.

अधिक माहिती अशी की पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे रेकॉर्डवरील आरोपी राजेश पवार गणेश काळे राहणार इंदिरानगर पाथरी व गौतम भगवान आदमाने राहणार सारोळा तालुका पाथरी या तिघांना ताब्यात घेऊन सदर गुन्ह्याबाबतची सखोल चौकशी केली असता कबुली दिली यावरून आरोपी राजेश पवार यांच्या घरून चोरी केलेल्या गॅस सिलेंडरच्या 14 टाक्या एका कंपनीच्या पिकप वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला राजेश पवार यांच्याकडे पात्री गॅस एजन्सी चे काम असून त्याने यापूर्वी घनसावंगी पोलीस स्टेशनच्या हद्दीतून कुंभारी पिंपळगाव येथून देखील गॅस सिलेंडरच्या जवळपास 60 टाक्या चोरल्याची माहिती तपासात उघड झाली आहे यांच्या आदेशावरून अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे स्थानिक गुना शाखेचे संपूर्ण अशोक जायभाय सपुनि नरके पोलीस अंमलदार विलास सातपुते रंगनाथ दुधाटे विष्णू चव्हाण मधुकर ढवळे हनुमान ढगे उत्तम हनुमंते घुगे बालाजी रेडी गणेश कवटकर यांच्या पथकाने ही कार्यवाही यशस्वीरित्या पूर्ण केली.

# एमकेसीएलच्या 'MS-CIT' ला राष्ट्रीय स्तरावरील मानाचा 'SKOCH Award' मिळाल्याने परभणीत सोमवारी पत्रकार परिषद व स्नेहभोजनाचे आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:**महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) च्या लोकप्रिय 'MS-CIT' अभ्यासक्रमाला डिजिटल साक्षरता (Digital Literacy) श्रेणीमध्ये देशातील अत्यंत प्रतिष्ठित आणि मानाचा 'SKOCH Award' प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार डिजिटल परिवर्तन आणि कौशल्य विकास क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च बहुमान मानला जातो. या ऐतिहासिक यशाचा आनंद साजरा करण्यासाठी आणि एमकेसीएलच्या आगामी महत्त्वपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यासाठी परभणीत विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार, दिनांक १३ जुलै रोजी दुपारी 12 वाजता हॉटेल विसावा (जिल्हा परिषद कन्या शाळेसमोर, परभणी) येथे या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या २५ वर्षांत एमकेसीएलने MS-CIT च्या माध्यमातून १.७ कोटीहून अधिक नागरिकांना डिजिटल साक्षर करून एक नवा टप्पा गाठला आहे. याच रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सध्या संपूर्ण राज्यात "आपण करूया महाराष्ट्र AI रेडी" ही ६० दिवसांची भव्य जनजागृती मोहीम राबवली जात आहे, ज्याअंतर्गत सर्वांसाठी मोफत 'AI मास्टरक्लास' उपलब्ध करून दिला जात आहे. या मोहिमेची परभणी जिल्ह्यातील सद्यस्थिती आणि इतर रोजगाराभिमुख कोर्सेसबाबतची (KLiC कोर्सेस) सविस्तर माहिती या पत्रकार परिषदेत दिली जाणार आहे.

या पत्रकार परिषदेत श्री. महेश पत्रिके, विभागीय समन्वयक, MKCL आणि काजल पवार, परभणी जिल्हा समन्वयक सर्व पत्रकारांशी संवाद साधतील.

या पत्रकार परिषदेस परभणी जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांनी आवर्जून उपस्थित राहावे, ही नम्र विनंती. पत्रकार परिषदेनंतर सर्व उपस्थितांसाठी स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# आधुनिक शेतीचा धडा थेट शाळेत; ढोरेगावच्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता :प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक शेतीबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि कृषीविषयक ज्ञानाची आवड वाढावी, या उद्देशाने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ढोरेगाव येथे 'माझी शाळा, माझे उपक्रम' अंतर्गत 'आनंददायी, दप्तरमुक्त शनिवार' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अजित सीड कंपनीचे प्रॉडक्शन मॅनेजर मोमीन शफी यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक शेती, पोषण आणि अन्नसुरक्षा या विषयांवर मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या वतीने मोमीन शफी यांचा स्नेहवस्त्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, सुधारित बियाण्यांचे महत्त्व, माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, शाश्वत शेती तसेच अन्नउत्पादन प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. दैनंदिन आहारातील पोषणमूल्ये, संतुलित आहाराची गरज, स्थानिक अन्नपदार्थांचा योग्य वापर आणि अन्नसुरक्षेचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी सोप्या भाषेत उत्तरे देत शेतीविषयीची जिज्ञासा वाढवली. या संवादातून विद्यार्थ्यांमध्ये शेतीकडे सकारात्मक दृष्टीकोन, वैज्ञानिक विचारसरणी आणि कृषी क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाबाबत उत्सुकता निर्माण झाली.

कार्यक्रमास केंद्रप्रमुख राजेश हिवाळे, दत्तात्रय दाणेकर, केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली पुन्हे, शिक्षक मनोज घुले, शंकर राऊत, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, नीलिमा कुलकर्णी, मुग्धा निमसे, सचिन पाटसकर, शामीर शेख, अली बाकोदा, कल्याणी जगताप यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# फर्दापूर ठाणा: जिओचा टॉवर 20 दिवसांपासून बंद; संतप्त ग्राहकांचा 'एअरटेल'कडे मोर्चा!

**फर्दापूर ( प्रतिनिधी):** आजच्या 'डिजिटल इंडिया'च्या काळात मोबाईल नेटवर्क ही अत्यंत जीवनावश्यक बाब बनली आहे. मात्र, फर्दापूर ठाणा येथे रिलायन्स जिओ (Jio) कंपनीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. येथील जिओचा टॉवर गेल्या तब्बल २० दिवसांपासून बंद असल्याने गावातील नागरिकांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. नेटवर्कच्या या सततच्या समस्येला कंटाळून अनेक ग्रामस्थांनी आता आपले मोबाईल नंबर 'एअरटेल' (Airtel) मध्ये पोर्ट (Porting) करण्यास सुरुवात केली आहे.

***टॉवर बंद, ग्रामस्थांचे हाल*:** फर्दापूर ठाणा परिसरातील जिओच्या टॉवरचे काम/दुरुस्ती रखडलेली आहे. सलग २० दिवस नेटवर्क नसल्यामुळे गावात कोणालाही तातडीचा फोन करणे, युपीआय (UPI) द्वारे ऑनलाईन आर्थिक व्यवहार करणे आणि विद्यार्थ्यांची ऑनलाईन कामे ठप्प झाली आहेत. एवढे दिवस टॉवर बंद असूनही कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले नसल्याने ग्राहकांमध्ये मोठी नाराजी आहे.

**वारंवार बंद पडल्यास आम्हीही पोर्ट करू' :**
जिओ नेटवर्कच्या या भोंगळ सेवेला कंटाळून गावातील काही लोकांनी आधीच आपला नंबर दुसऱ्या कंपनीत (एअरटेल) पोर्ट करून घेतला आहे. या परिस्थितीवर संताप व्यक्त करताना स्थानिक नागरिक सलीम शेख आणि योगेश मगरे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, "जिओचे नेटवर्क जर असेच वारंवार बंद पडत राहिले आणि आम्हाला वेळेवर सुविधा मिळाली नाही, तर नाईलाजास्तव आम्हीसुद्धा आमचे नंबर दुसऱ्या नेटवर्कमध्ये पोर्ट करू."

***जिओ ग्राहक गमावण्याची शक्यता :**
एकीकडे फर्दापूर हे जागतिक दर्जाच्या अजिंठा लेणीच्या जवळचे महत्त्वाचे गाव आहे, तिथेच अशी दयनीय अवस्था असल्याने स्थानिक आणि पर्यटकांचीही गैरसोय होत आहे. जिओ कंपनीने तातडीने या टॉवरची दुरुस्ती करून नेटवर्क सेवा पूर्ववत न केल्यास, त्यांना फर्दापूरमधील आपले बहुतांश ग्राहक गमवावे लागतील, हे मात्र निश्चित!



# वनामकृविच्या कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात 'सर्प जनजागृती कार्यक्रम' उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे तसेच ॲनिमल वेलफेअर चॅरिटेबल ट्रस्ट, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० जुलै २०२६ 'सर्प जनजागृती कार्यक्रम' उत्साहात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राहुल रामटेके हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध सर्पमित्र इंजी. वेदांत माळवटकर (परभणी) यांनी विद्यार्थ्यांना सर्पांविषयी वैज्ञानिक व उपयुक्त माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. राहुल रामटेके यांनी पर्यावरण संवर्धनासाठी जैवविविधतेचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी निसर्ग व वन्यजीव संरक्षणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवून समाजात जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि नेतृत्वगुण विकसित करणारे प्रभावी व्यासपीठ असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मार्गदर्शन करताना इंजी. श्री. वेदांत माळवटकर यांनी विषारी व बिनविषारी सापांची ओळख, सर्पांचे पर्यावरणीय महत्त्व, साप आढळल्यास घ्यावयाची योग्य काळजी, सर्पदंश झाल्यास करावयाचे प्रथमोपचार तसेच करावयाच्या व टाळावयाच्या बाबी याविषयी सविस्तर माहिती दिली. साप हे निसर्गाच्या अन्नसाखळीतील महत्त्वाचे घटक असून त्यांचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सापांना इजा न करता किंवा न मारता प्रशिक्षित सर्पमित्रांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

# SIR प्रक्रियेला गती द्या; शासकीय कर्मचाऱ्यांना सर्वंकष प्रशिक्षण देण्याची सैय्यद अशफाक अली यांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरात सध्या विशेष गहन पुनरिक्षण (SIR) प्रक्रियेची सर्वत्र चर्चा सुरू असून, अनेक ठिकाणी हे काम संथ गतीने सुरू असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस माथाडी कामगार संघटनेचे मराठवाडा सरचिटणीस सैय्यद अशफाक अली यांनी शासनाने SIR प्रक्रियेला गती देण्याबरोबरच संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांना सर्वंकष प्रशिक्षण द्यावे, अशी मागणी केली आहे.

सैय्यद अशफाक अली म्हणाले की, सध्या SIR प्रक्रियेबाबत शासकीय कार्यालये, महाविद्यालये, मॉल, हॉटेल तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. अनेक ठिकाणी SIRचे काम संथ गतीने सुरू असल्याचे नागरिकांकडून बोलले जात असून, ही प्रक्रिया अधिक वेगाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्याची गरज आहे.



ते पुढे म्हणाले की, SIR प्रक्रियेदरम्यान नागरिकांकडून विविध कागदपत्रे आणि माहिती स्वीकारली जात आहे. त्यामुळे भविष्यात कोणत्याही नागरिकाला शासकीय योजना, प्रमाणपत्रे किंवा इतर प्रशासकीय कामांमध्ये अडचणी येऊ नयेत, यासाठी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना SIR संदर्भात सखोल, दूरदृष्टीपूर्ण आणि सर्वंकष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

अनेक शासकीय प्रमाणपत्रांवर "आपण दिलेल्या माहितीच्या आधारे हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे" अशी नोंद असते. त्यामुळे SIR प्रक्रियेत प्रत्येक कागदपत्राची पडताळणी, नोंदणी आणि माहितीची शहानिशा अत्यंत अचूक व जबाबदारीने होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

SIR ही प्रक्रिया नागरिकांच्या भविष्यातील प्रशासकीय सोयी-सुविधांशी निगडित असल्याने शासनाने आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून प्रक्रिया अधिक गतिमान, पारदर्शक आणि त्रुटीमुक्त पद्धतीने पूर्ण करावी, अशी मागणी सैय्यद अशफाक अली यांनी केली.

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टतर्फे बदनापूर येथे 103 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**जालना :** लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वतीने शनिवार, दि.११ जुलै २०२६ रोजी बदनापूर सेंटरअंतर्गत १०३ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम रावसाहेब दानवे पाटील डी. फार्मसी कॉलेज, बदनापूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आयोजन लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जालना विभागाचे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी श्री. जोमा मस्ती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रावसाहेब दानवे पाटील डी. फार्मसी कॉलेजचे विभागप्रमुख प्रा. शंकर खंदारे हे होते.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. जी. डोईफोडे (मुख्याध्यापक, साई हायस्कूल, अकोला-बदनापूर), मा. श्री. पी. आर. उगळमुळे (मुख्याध्यापक, शांतिदेवी शार्के विद्यालय, बदनापूर) तसेच उद्योजक श्री. अर्जुन दाभाडे उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वास यांच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले.

या शैक्षणिक वर्षात ट्रस्टच्या माध्यमातून १०३ विद्यार्थ्यांना शालेय बॅग, रजिस्टर, कंपास बॉक्स, चित्रकला वही, आलेख पुस्तक तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी, "शिक्षण हेच यशाचे खरे साधन आहे. संस्थेकडून मिळणाऱ्या मदतीचा योग्य उपयोग करून प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःच्या पायावर उभे राहून समाजात आदर्श स्थान निर्माण करावे," असे प्रतिपादन केले.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट ही संस्था २००८ पासून जालना जिल्ह्यातील मंठा, वाटूर, जालना, बदनापूर आणि भाटेपुरी या भागांत विविध सामाजिक व शैक्षणिक प्रकल्प राबवत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्यविकास आणि शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक मदत, व्यक्तिमत्त्व विकास उपक्रम आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रमही संस्थेमार्फत राबविले जातात. संस्थेच्या संस्थापिका डॉ. विल्ली डॉक्टर आहेत.

या कार्यक्रमास लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो प्लस प्रकल्पाचे प्रतिनिधी, एसएफएसईपी प्रकल्पाचे जालना विभाग समन्वयक सुबोध खंदारे, केंद्र कार्यकारी कैलास कोल्हे, शिवाजी काजळकर तसेच सोनाली कोरडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपक्रमाचे स्वागत व कौतुक केले.

## एमजीएममध्ये चौथ्या इंडोसर्ज राष्ट्रीय परिषदेचे उत्साहात उद्घाटन; 300 शल्यचिकित्सकांचा सहभाग



**छत्रपती संभाजीनगर :** एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलच्या एमजीएम सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी अँड अॅडव्हान्स्ड मिनिमल अॅक्सेस सर्जरी यांच्या वतीने आणि औरंगाबाद सर्जिकल सोसायटीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या इंडोसर्ज राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आज द्योतन हॉल येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. चेन्नई येथील ज्येष्ठ एंडोस्कोपी तज्ज्ञ डॉ. बी. कृष्णा राव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, अधिष्ठाता डॉ. आर. बी. बोहरा, उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी, शल्यचिकित्सा विभागप्रमुख डॉ. भास्कर मुसांडे, डॉ. राजेंद्र शिंदे, डॉ. नवीन कासलीवाल, डॉ. वैरागड, डॉ. विकास देशमुख यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, वैद्यकीय तज्ज्ञ आणि शल्यचिकित्सक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावर्षीच्या परिषदेची संकल्पना 'एव्हरीथिंग अबाउट एंडोस्कोपी फॉर सर्जन्स' अशी असून एंडोस्कोपी क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण उपचारपद्धती आणि कौशल्यांचा सर्वांगीण आढावा या परिषदेत घेतला जात आहे. उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी १८ लाईव्ह क्लिनिकल केसेस, त्यामध्ये १२ प्रमुख शस्त्रक्रिया आणि पाच तज्ज्ञांची व्याख्याने यशस्वीरित्या पार पडली. या सत्रांमधून सहभागी डॉक्टरांना अत्याधुनिक एंडोस्कोपिक प्रक्रियांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहण्याची आणि तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.

एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून अत्याधुनिक एंडोस्कोपिक आणि मिनिमल अॅक्सेस शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या जात आहेत. या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार व्हावा, देशभरातील शल्यचिकित्सकांना अद्ययावत प्रशिक्षण मिळावे तसेच रुग्णांना अधिक सुरक्षित, कमी वेदनादायक आणि परिणामकारक उपचार उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेदरम्यान २५ हून अधिक लाईव्ह एंडोस्कोपी प्रक्रिया, अत्याधुनिक उपचारपद्धतींचे थेट प्रक्षेपण, वैज्ञानिक व्याख्याने, तज्ज्ञांची चर्चासत्रे आणि आधुनिक उपचारतंत्रांवरील सखोल मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या माध्यमातून एंडोस्कोपी क्षेत्रातील नवीन संशोधन, तांत्रिक प्रगती आणि उपचारपद्धतींची प्रभावी देवाणघेवाण होणार आहे.

या राष्ट्रीय परिषदेत देशभरातील ३०० हून अधिक शल्यचिकित्सक, वैद्यकीय शिक्षक, सुपर-स्पेशालिस्ट, रेसिडेंट डॉक्टर्स, पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक आणि वैद्यकीय विद्यार्थी सहभागी झाले असून आधुनिक एंडोस्कोपी तंत्रज्ञान, कौशल्य आणि संशोधनाची देवाणघेवाण करण्यासाठी हे व्यासपीठ महत्त्वपूर्ण ठरत आहे. राज्यासह देशभरातील वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी या परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने शल्यचिकित्सा क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान आणि कौशल्य वृद्धिंगत करण्यास या उपक्रमाची मोलाची मदत होणार असल्याचा विश्वास उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी यावेळी व्यक्त केला.

## निकृष्ट दर्जाचे राशन वाटप करणाऱ्या पुरवठा विभागाचे चौकशी करा लाभार्थ्यांची मागणी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** पूर्णा शहरातील सार्वजनिक वितरण प्रणाली(रेशन ) व तसेच ग्रामीण भागातही गेल्या कित्येक महिन्यापासून तांदूळ व गहू वितरित केले जात आहेत अशी तक्रार लाभार्थी करीत आहेत. एक तर राशन उशिरा येते काही दुकानदार आपल्या सवलतीनुसार वेळ मिळेल तसं धान्यवाटप करतात या दुकानदारांना धन्यवाद वेळेत करण्याचा टाईम टेबल नसून आपल्या घरचा काम संपल्यानंतर धान्य वाटप करतात. ते धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याने तांदुळाच्या राशनाचे गुणवत्तेवर लाभार्थ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून अनेक लाभार्थ्यांनी तांदूळ खाण्यायोग्य नसल्याचे म्हटले आहे अशा निकष दर्जाच्या तांदूळ रेशन द्वारे वाटप करण्यात आल्याने लाभार्थ्यामध्ये संतापाची लाट उसळली आहे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोशीवर कार्यवाही करण्याची मागणी लाभार्थ्या कडून केली जात आहे. अधिक माहिती अशी की उत्कृष्ट दर्जाच्या धान्याबाबत रेशन दुकानदारांना पुरवठा विभागाकडून प्राप्त होणारे धान्य लाभार्थ्यांना वाटप करण्यात येत असून धान्याच्या गुणवत्तेबाबत आमचाकोणताही संबंध नसल्याचे राशन दुकानादरांकडून म्हटले जात आहे एप्रिल महिन्याचे धान्य साठा पुरवठा विभागाकडून अद्यापही प्राप्त झाला नसल्याचे व त्याच महिन्याचं मोफत धान्य लाभार्थ्यांना व्यतिरिक्त करता आले नसल्याचेही काही दुकानदारांनी सांगितले पुरवठा विभागामध्ये चाललेल्या सावळ्या गोंधळाची चौकशीव प्रकरणाची सखोल चौकशी करावी निकष दर्जाचा दिले जाणाऱ्या निकृष्ट दर्जाचा धान्य पुरवठा तात्काळ थांबवून धान्याच्या गुणवत्तेची तपासणी करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे

## नेमीचंद चुडीवाल यांचे निधन



**छत्रपती संभाजीनगर :** नादंर ता.पैठण येथील जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य नेमीचंद चुनीलाल चुडीवाल (वय ८९) यांचे शुक्रवार, दि.१० जुलै रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मुळ गावी अहिल्यानगर (अहमदनगर) येथे शनिवारी ११ जुलै रोजी नालेगाव उमरधाम येथे अत्यसंस्कार करण्यात आले. दिगंबर जैन समाजातील धार्मिक कार्यक्रमामध्ये त्यांच्या सक्रीय सहभाग होता. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, नातवंडे असा परिवार आहे. वैजापूर येथील रहिवासी सौ.सुरज महावीर ठोळे यांचे वडील होते.

# मिडसांगवी येथे नाथांच्या पालखी पादुकाचे रंगले रिंगण सोहळा - बीड जिल्ह्यात दाखल

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**पैठण दि १२: :** एकनाथ महाराज पादुका पालखी सोहळ्याचा तिसरा मुक्काम कुंडल पारगाव या ठिकाणी संपन्न झाला. या ठिकाणी श्रीसंत भगवान बाबा व श्रीसंत एकनाथ महाराज संतभेट सोहळा श्रीसंत भगवान बाबा संस्थांच्या वतीने संपन्न झाल्यावर पालखी सोहळ्याने माळेगाव मार्गे प्रस्थान करून पहिल्या रिंगणासाठी मिडसांगवी येथे दाखल झाला. यावेळी मिडसांगवी येथे रिंगण सोहळ्यासाठी विसावा स्थळाचे निर्माण करण्यात आल्याने पालखी विसावा स्थळाचे लोक अर्पण सोहळा प्रमुख नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले, अँड. योगेश महाराज गोसावी पालखीवाले यांच्या हस्ते करण्यात आले.



वारकरी प्रथेप्रमाणे पहिले रिंगण सोहळ्याला संत भगवान बाबा गडाच्या पायथ्याशी मिडसांगवी ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर या पंचक्रोशीत सुरुवात करण्यात आली. या सोहळ्यात आलेल्या हजारो वारकऱ्यांनी व महाराज मंडळी यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात पहिले रिंगण मोठ्या उत्साहात साजरे केले . हा सोहळा पाहण्यासाठी व नाथांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील हजारो भाविकांनी गर्दी केली. यामध्ये महिला भाविकांचा मोठ्या संख्येने समावेश होता.

या रिंगण सोहळ्यामुळे वारकऱ्यात पंढरीला जाण्यासाठी नवचैतन्य मिळाले आहे.

पालखी सोहळ्याच्या प्रथेप्रमाणे विठुरायाच्या पंढरीच्या आषाढी वारी सोहळ्यात सहभाग होण्यासाठी ऊन पाऊस वाऱ्याची चिंता न करिता दर गाव दर मुक्काम करीत आहे. खांद्यावर भगव्या पताका घेऊन टाळ मृदंगाचा गजर आणि भानुदास एकनाथ जय घोष करीत मुखी विठ्ठलाचा अभंग गात पंढरीच्या दिशेने पायी दिंडीत चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पावलांचा थकवा दूर करण्यासाठी नाथांच्या पादुका सोहळ्याचे पहिले रिंगण चाललेल्या प्रथेनुसार मिडसांगवी पंचक्रोशीत पालखी सोहळा प्रमुख नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. यावेळी पाथर्डी प्रशासनाच्या वतीने प्रांत अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, पंचायत समिती गट विकास अधिकारी राजेंद्र धस, विस्तार अधिकारी गाडेकर, ह.भ.प हनुमंत शास्त्री, पोलीस निरीक्षक आनंद केकरे, मिडसांगवी सरपंच भगवान हजारे, उपसरपंच विष्णू थोरात, संदीप बेंद्रे यांच्यासह पंचक्रोशीतील विविध मान्यवर भजन मंडळी भाविकांनी नाथांच्या पादुकांचे पूजन करून आलेल्या वारकऱ्याचे स्वागत करून महाप्रसाद वाटप केला. सायंकाळी नाथाचा पालखी सोहळा मुंगसवाडे ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर येथून शिरूर कासार, राक्षस भुवन बीड जिल्ह्यात दाखल झाला आहे.

## सावित्रीबाई फुले भाजी मंडईतील पात्र ओटे-गाळेधारकांना लवकरच जागांचे वाटप

### स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची नोंदणी प्रक्रियेची पाहणी; अधिकाऱ्यांना प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** तब्बल १४ वर्षांनंतर पुन्हा सुरू होत असलेल्या संभाजीपेठ येथील सावित्रीबाई फुले भाजी मंडईतील पात्र ओटे व गाळेधारकांना लवकरात लवकर जागांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी दिली.

महानगरपालिकेच्या वतीने मंडईतील ओटे व गाळ्यांच्या नोंदणीसाठी १ ते ४ जुलैदरम्यान आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्यात आली.



यामध्ये गाळे वाटप पत्र, शुल्क भरल्याच्या पावत्या, करारनामा, न्यायालयीन आदेश अथवा प्रलंबित प्रकरणांची कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आदी कागदपत्रांचा समावेश होता.

सध्या मालमत्ता विभागाकडून प्राप्त कागदपत्रांची छाननी सुरू असून पात्र ओटे व गाळेधारकांकडून नियमानुसार शुल्क स्वीकारले जात आहे. या प्रक्रियेची पाहणी करण्यासाठी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी संबंधित कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी ओटे व गाळेधारकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच नोंदणी प्रक्रिया पारदर्शक आणि जलदगतीने पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर जागांचे वाटप करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

संभाजीपेठ येथील सावित्रीबाई फुले भाजी मंडईचे काम पूर्णत्वाकडे असून लवकरच मंडई सुरू होणार असल्याने व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## लोकसंख्या नियंत्रण ही आजच्या काळाची गरज- डॉ. दिपक पारधे




**सोयगाव :** वाढती लोकसंख्या ही देशाच्या विकासातील प्रमुख अडथळा असून,त्याबाबत जनजागृती करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ.दिपक पारधे यांनी केले. 'जागतिक लोकसंख्या दिना 'निमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते तर प्रमुख उपस्थितीत डॉ.रावसाहेब बारोटे,कार्यालयीन अधिक्षक श्री पंकज साबळे हे होते. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकसंख्या नियंत्रण व शाश्वत विकास या विषयावर आपली मते मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक सुनील चौधरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी शिरसाट यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ . मनोजकुमार चोपडे, डॉ.पंकज गावित, डॉ. सुशील जावळे, डॉ.भगत, डॉ. प्रदीप गोल्हारे, डॉ. संतोष पडघन, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## बारावीनंतर पदवीसोबतच यूपीएससी-एमपीएससीची तयारी

छत्रपती संभाजीनगर : बारावीनंतर पदवी शिक्षण घेतानाच यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाच्या एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसने बी.ए. (अॅडमिनिस्ट्रेशन) हा एकात्मिक अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, खर्च आणि स्वतंत्र तयारीचा ताण कमी होऊन




पदवीसोबतच स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी होणार असल्याची माहिती स्कूलचे संचालक डॉ. सुजित धर्मपात्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेला हा अभ्यासक्रम यूपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत आहे. भारतीय राज्यघटना, सार्वजनिक प्रशासन, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध, सुशासन, सार्वजनिक धोरण, पर्यावरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, चालू घडामोडी, तार्किक क्षमता, नेतृत्व, उत्तरलेखन, मुलाखत कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास अशा विषयांचा त्यात समावेश आहे.

## विभागीय बुडो मार्शल आर्ट रेफ्री सेमिनार कांचनवाडी मार्शल आर्टस ट्रेनिंग सेंटर येथे संपन्न




**बिडकीन दि १० जुलै :** मार्शल आर्टस कुंग-फू कराटे ट्रेनिंग सेंटर कांचनवाडी येथे बुडो मार्शल आर्ट विभागीय दि ५ जुलै सेमिनार घेण्यात आला या सेमिनारचे आयोजन - बुडो मार्शल आर्ट अॅमेच्युअर असोसिएशन ऑफ छत्रपती संभाजी नगर जिल्हा व बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विधमानाने डिव्हिजनल बुडो मार्शल आर्ट सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते, जिल्हा क्रीडा संघटक संस्थापक अध्यक्ष पवन घुगे, सचिव प्रवीण घुगे यांनी सेमिनारच्या आयोजन केले होते, बुडो मार्शल आर्ट हा एक लोकप्रिय खेळ आहे या खेळाचे तंत्रशुद्ध व तांत्रिक पद्धतीने प्रशिक्षण ब्लॅक बेल्ट विद्यार्थी व विभागातून आलेल्या प्रशिक्षकांना पंच सेमिनारच्या आयोजन केले होते. या सेमिनारमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षकांना विभागीय पंच परीक्षक प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत, बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र - संघटनेचे अध्यक्ष - शिहान लहू पारवे, टेक्निकल डायरेक्टर शिहान संतोष कुलकर्णी, टेक्निकल डायरेक्टर बुडो फेडरेशन शिहान सचिन पटेकर, नवीन ठाकूर यांनी खेळाची नियमावली व तंत्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण देऊन प्रॅक्टिकल करून घेतले. हिंगोली जिल्हा - नवनाथ बांगर, पैठण तालुका यशोधन घुगे, छत्रपती संभाजीनगर अनुश्री घुगे, तनुश्री राठोड, धनश्री वाघ, धनश्री शिदवाडकर, ऋतुजा रणवळकर, मंगल कवडे, श्याम बुधवंत, गौरव टोकटे,युवराज दळवे सय्यद हाशीर अली आशाज खान पठाण, राम चौरे, आदींनी या सेमिनारमध्ये सहभाग नोंदविला.

## एमजीएम विद्यापीठाचा द हिंदू समूहासोबत सामंजस्य करार; पत्रकारिता विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची संधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया आणि द हिंदू समूह यांच्यात पत्रकारिता विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण व व्यावहारिक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे महाराष्ट्रात द हिंदू समूहासोबत असा करार करणारे एमजीएम हे पहिले विद्यापीठ ठरले आहे.

करारावर द हिंदू समूहाचे सहायक उपाध्यक्ष एम. वैद्यनाथन, सहायक महाव्यवस्थापक पी. ए. सुदेश तसेच एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी कुलपती अंकुशराव कदम, प्रा. जयदेव डोळे, ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके,



डॉ. प्राप्ती देशमुख, डॉ. परमिंदर कौर, बैजू पाटील आदी उपस्थित होते. या कराराअंतर्गत 'द हिंदू सेंटर फॉर एक्सलन्स इन जर्नालिझम'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, न्यूज रूम व प्रेस भेटी, द हिंदूचे एक वर्षाचे सदस्यत्व, विशेष प्रकाशनांचा लाभ आणि गुणवंत विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यावेळी एम. वैद्यनाथन यांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार पत्रकारिता शिक्षण आणि उद्योगाचा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे सांगितले. कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी एमजीएम विद्यापीठ विद्यार्थी, शिक्षक आणि उद्योगक्षेत्र यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे नमूद केले. या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यात भर पडून माध्यम क्षेत्रातील करिअरसाठी ते अधिक सक्षम होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रेखा शेळके यांनी केले, तर सूत्रसंचालन विद्यार्थिनी पल्लवी बेद्रे यांनी केले.

# युथिका आयोजित छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव 2026चे आयोजन

**छत्रपती सभाजीनगर :** युथिका ही २०० हून अधिक सदस्यांची युवा-नेतृत्वाखाली कार्यरत असलेली स्वयंसेवी संस्था असून, गेल्या पाच वर्षांपासून एड्सग्रस्त बालकांची काळजी, महिला सक्षमीकरण प्रकल्प, मासिक पाळी स्वच्छता जनजागृती व साहित्य वितरण तसेच दर सोमवारी गोशाळांना भेट देऊन ५५० हून अधिक गायींसाठी चाऱ्याची व्यवस्था अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजसेवा करत आहे. संस्थेच्या संस्थापक सय्योमिता नहार यांच्या नेतृत्वाखाली युथिकाने समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

स्वयंभू संस्था म्हणून युथिका आपल्या सामाजिक उपक्रमांसाठी आवश्यक निधी स्वतः उभारते. त्यासाठी संस्था मॉडेल युनायटेड नेशन्स (MUN) तसेच छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव २०२६ यांसारख्या निधी संकलन उपक्रमांचे आयोजन करते. यंदाच्या क्रीडा हा 18 व 19 जुलै रोजी ईनफ्युटौ टर्फ बीडबायपास महोत्सवामध्ये क्रिकेट, फुटबॉल आणि पिकलबॉल या स्पर्धांचा समावेश आहे.




यंदाच्या महोत्सवाचे टायटल स्पॉन्सर रेडफिट जिम असून त्याच्या संचालिका सौ. पौर्णिमा राजपूत यांच्या सहकार्यामुळे युवकांचा विकास, तंदुरुस्ती आणि सामाजिक बांधिलकीला मोठे बळ मिळत आहे. तसेच को-टायटल स्पॉन्सर जबिंदा बिल्टस्पेसचे संचालक श्री. गुणवंत सिंह जबिंदा यांनीही या उपक्रमाला मोलाचे सहकार्य देत सामाजिक कार्याला प्रोत्साहन दिले आहे. यंदाच्या महोत्सवाचे शिक्षण प्रायोजक स्टेपिंग स्टोन्स हायस्कूल असून, श्री. झईम रहीम यांनी या उपक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले आहे.

क्रिकेट स्पर्धेत श्री. उदय फेपाळे (MOP Dominators), श्री. प्रज्वल भगत (Lumen), सौ. पौर्णिमा राजपूत (Redfit), श्री. सलमान सुरी (SK Infra), श्री. अबुबकर पटेल (Patel Strikers), श्री. अंशुमन देसाई, श्री. आयुष इसरानी, श्री. विक्रांत राजपूत (Terra), श्री. तरंग तोतला (Sledgers United) आणि श्री. सुमित सोनी (Ather) यांच्या मालकीचे संघ सहभागी होणार आहेत.

या निधी संकलन उपक्रमाद्वारे युथिका क्रीडेच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत सामाजिक उपक्रमांना अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न करत आहे.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911